सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. २०] गुरुवार ते बुधवार, मे १४-२०, २०२६ : वैशाख २४-३०, शके १९४८ [पृष्ठे - १८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | पृष्ठे ५११ ते ५१६ | भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | पृष्ठे २१ ते २२ |
| संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले. | ५१७ ते ५२६ | | |

# शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून**
**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- ३०/०१/२०२६**

**आदेश**

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.-***

**क्र. टिपीएस - ३७२५/४२३/प्र.क्र.१५०/२०२५/नवि -३० :-** ज्याअर्थी, लातूर शहर महानगरपालिकेची (सु.+ वा.ह.) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना, १९६६ अधिनियम (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस - ३७००/४७१/प्र.क्र.१५३(ए)/२०००/नवि- ३०, दि. ०२/०१/२००२ अन्वये भागशः मंजूर झाली असून ती दि.१८/०२/२००२ पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन अधिसूचना क्र. टिपीएस/३७१४/६२३/सीआर-१७१(ए)/ २०१४/नवि-३०,दि. ३०/०८/२०१५ अन्वये मंजूर झाली असून, ती दि.०८/१२/२०१६ रोजी अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. कन्हेरी, ता.जि. लातूर मधील स.क्र. ४० मधील क्षेत्र (यापुढे "उक्त आरक्षित जमीन" असे संबोधिले आहे) आ.क्र.१६६- 'माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान' व आ.क्र.१६७- 'प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान'(यापुढे "उक्त आरक्षणे" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांचे समुचित प्राधिकरण लातूर शहर महानगरपालिका आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षित जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील उक्त आरक्षित जमीनीपैकी मौ. कन्हेरी, ता. जि. लातूर मधील स.क्र.४० (पै.) या जमिनीच्या मालकांनी (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणांच्या अनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणांसंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* अन्वये दि.०८/१०/२०१८ रोजी सूचना बजावली आहे. (यापुढे "उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ (४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. ४१८५/२०२१ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २०/०२/२०२४ रोजी अंतिम निर्णय पारीत केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* मधील तरतूदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* नुसार प्राप्त अधिकारात शासन, खालील नमूद अटींच्या अधिन राहून, खालील परिशिष्टात नमूद केल्यानुसार, लातूर शहर महानगरपालिकेच्या (सु.+ वा.ह.) विकास योजनेतील, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीन मालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

***अटी***

***अट क्र.१*** *- सुचनाकर्ते यांनी त्यांचे सुचनेंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशामध्ये नमुद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहतील.*

***अट क्र.२*** *- सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमिन मालकांनी सुचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा संबंधीत नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.*

**परिशिष्ट**

| अ. क्र. | गावाचे नांव तालुका व जिल्हा | जमिनीचा सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र | मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १. | मौ. कन्हेरी जि. लातूर | स.क्र. ४० (पै.) | सूचनाकर्ते यांच्या मालकीचे एकूण बाधित क्षेत्र | आ.क्र.१६६- 'माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान' व आ.क्र.१६७- 'प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान' |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

(प्रसाद रा. शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

---

**By The Under Secretary to Government**

**Government of Maharashtra**

**Urban Development Department**

**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**

**Mantralaya, Mumbai 400 032.**

**Dated : - 30/01/2026**

**ORDER**

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966:***

**No. TPS - 3725/423/C.R.150/2025/UD - 30 :-** Whereas, the Development Plan of Latur City Municipal Corporation (R+AA) has been partly sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS - 3700/471/ CR-153(A)/2000/ UD - 30, dt. 02/01/2002 and has come into force with effect from dated the 18/02/2002 and the Republished Development Plan of the Excluded Parts of substational nature modifications of Latur City Municipal Corporation has been sanctioned by the Government under section 31 of the said Act vide Notification No. TPS-3714/623/ CR-153(A)/2014/UD-30, dt.31/08/2015 and has come into force with effect from dt.09/12/2016 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No. 40 of Mauje Kanheri, Tal. & Dist. Latur (hereinafter referred to as "the said Reserved Land") is reserved for Site No. 166 - 'Secondary School & Play Ground' and Site No. 167 - 'Primary School & Play Ground', (hereinafter referred to as "the said Reservations");

And whereas, the Latur Municipal Corporation is "Appropriate Authority" for the said Reservations. (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the said Reserved Land has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

Ànd whereas, the Owner of the land bearing Survey No. 40 (Part), of Mauje Kanheri, Tal. & Dist. Latur, (hereinafter referred to as "the said Land") out of the said Reserved Land, had served a notice dated 08/10/2018 under section 127*(1)* of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority, in reference to the said Reservations. (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, even after service of the said Notice as aforesaid , the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126 *(4)* of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of said Notice under sub- section (1) of section 127 of the said Act;

And whereas, the owners of the said Land have filed Writ Petition No. 4185/2021 before the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench, and the final order is passed on dated the 20/02/2024 by the Hon'ble High Court;

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notice, nor Notification of land acquisition required under section 126*(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservations on the said Land stands lapsed as per the provisions of section 127*(1)* of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservations on the said Land as specified in the Santioned Development Plan of Latur City (Revised and Extended Limit), stands lapsed and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan, subject to the following condition;

**CONDITIONS**

***Condition No. 1 -*** *Since the noticer not submitted a recent and certified Mojani Sheet of the said land, the noticer themself will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding the area mentioned in the said order.*

***Condition No. 2 -*** *Before authenticating the part plan in accordance with the said order, the concerned land owners will be required to submit a recent and certified Mojani Sheet of their proposed area from the Land Records Department to the concern Planning Authority.*

**ANNEXURE**

| Sr. No. | Name of the Village, Taluka and Dist. | Survey No./ Hissa No. | Area lapsed under section 127 *(2)* of the said Act (approximately) | Reservation of sanctioned Development Plan |
|---|---|---|---|---|
| 1 | Mauje Kanheri, Tal. & Dist. Latur | Survey No. 40 (Part) | Affected Area Owned by The Noticer | Site No. 166 - 'Secondary School & Play Ground' and Site No. 167 - 'Primary School & Play Ground' |

A copy of the Part Plan, showing the area of the said Modified Reservation which has been lapsed *vide* this Order, will be available in the office of the Commissioner, Latur Municipal Coporation, Dist. Latur during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts/Rules).

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

(Prasad R. Shinde)
**Under Secretary to Government**

---

२

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक :- ३०/०१/२०२६**

**आदेश**

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. :-***

**क्र. टिपीएस - ३७२५/१२९७/प्र.क्र.२५९/२०२५/नवि -३० :-** ज्याअर्थी, लातूर शहर महानगरपालिकेची (सु. + वा.ह.) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना, अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे.) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस - ३७००/४७१/सिआर - १५३(अ)/२०००/नवि- ३०, दि. ०२/०१/२००२ अन्वये मंजूर केली असून ती दि.१८/०२/२००२ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. लातूर, जि. लातूर येथील स.नं.१२८ -अ (पै.) या जागेवरील भूखंड क्र. ४१, ४२ व ४३ मधील क्षेत्र (यापुढे "उक्त आरक्षित जमीन" असे संबोधिले आहे) 'आ.क्र.४९- खेळाचे मैदान (यापुढे "उक्त आरक्षण" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण लातूर शहर महानगरपालिका आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षित जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील उक्त आरक्षित जमीनीपैकी मौ. लातूर, जि. लातूर येथील स.नं.१२८-अ (पै.) या जागेवरील भूखंड क्र. ४१, ४२ व ४३ (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) क्षेत्राच्या मालकांनी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणासंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* अन्वये दि.१९/०५/२०२२ रोजी सूचना बजावली आहे. (यापुढे "उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.६६६५/२०२४ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.२२/०७/२०२४ रोजी अंतिम निर्णय पारीत केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* मधील तरतूदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* नुसार प्राप्त अधिकारात शासन, खालील नमूद अटींच्या अधिन राहून, खालील परिशिष्टात नमूद केल्यानुसार, लातूर शहर महानगरपालिकेच्या (सु.+ वा.ह.) विकास योजनेतील, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या वापर विभागात अन्यथा अनुज्ञेय असलेल्या वापर विभागाकरीता उपलब्ध होईल;

***अटी***

***अट क्र.१*** *- सुचनाकर्ते यांनी त्यांचे सुचनेंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशामध्ये नमुद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहतील.*

***अट क्र.२*** *- सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमिन मालकांनी सुचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा संबंधीत नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.*

**परिशिष्ट**

| अ. क्र. | गावाचे नांव तालुका व जिल्हा | जमिनीचा सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र | मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १. | मौ. लातूर ता. व जि. लातूर | स.नं.१२८-अ (पै.) या जागेवरील भूखंड क्र. ४१, ४२ व ४३ | अंदाजे १२०७.७८ चौ.मी. | आ.क्र.४९ - खेळाचे मैदान (भागशः) |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,***

(प्रसाद रा. शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

---

**By The Under Secretary to Government**

**Government of Maharashtra**

**Urban Development Department**

**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**

**Mantralaya, Mumbai 400 032.**

**Dated : - 30/01/2026**

**ORDER**

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966:***

**No. TPS - 3725/1297/C.R.259/2025/UD - 30 :-** Whereas, the Revised Development Plan of Latur City has been sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS - 3700/471/ CR-153(A)/2000/ UD - 30, dated the 02/01/2002 and has come into force with effect from dated the 18/02/2002 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No. 128-A(Pt.), Plot No.41, 42 & 43 of Mauje Latur, Dist. Latur (hereinafter referred to as "the said Reserved Land") is reserved for 'Site No. 49 - Play Ground', (hereinafter referred to as "the said Reservation");

And whereas, the Latur Municipal Corporation is "Appropriate Authority" for the said Reservation. (hereinafter referred to as "the said Appropriate Authority")

And whereas, the said Reserved Land has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

Ànd whereas, the Owner of the land bearing Survey No. 128-A (Pt.), Plot No.41, 42, & 43 of Mauje Latur, Dist. Latur (hereinafter referred to as " the said Land") out of the said Reserved Land, in reference to the Said Reservation, had served a notice dated the 19/05/2022 under section 127*(1)* of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, even after service of the said Notice as aforesaid , the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126 *(4)* of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of said Notice under sub- section (1) of section 127 of the said Act;

And whereas, the owners of the said Land have filed Writ Petition No. 6665/2024 before the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench, and the final order is passed on dated the 22/07/2024 by the Hon'ble High Court;

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notice, nor Notification of land acquisition required under section 126*(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservation on the said Land stands lapsed as per the provisions of section 127*(1)* of the said Act;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that,the said Reservation on the said Land as specified in the Santioned Development Plan of Latur City (Revised and Extended Limit), stands lapsed and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan, subject to the following condition;

**CONDITIONS**

**Condition No. 1 -** Since the noticer has not submitted a recent and certified Measurement Sheet of the said Land, the noticer himself will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding the area mentioned in this order.

**Condition No. 2 -** Before authenticating the part plan in accordance with the said order, the concerned land owner will be required to submit a recent and certified Measurement Sheet of their proposed area from the Land Records Department to the concern Planning Authority.

**ANNEXURE**

| Sr. No. | Name of the Village, Taluka and Dist. | Survey No./ Hissa No. | Area lapsed under section 127 *(2)* of the said Act | Reservation of sanctioned Development Plan |
|---|---|---|---|---|
| 1 | Mauje Latur, Dist. Latur | Survey No.128-A(Part) Plot No.41, 42 & 43 | Approximately 1207.78 Sq.mt. | 'Site No. 49- Play Ground' (Partly) |

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservations which has been lapsed *vide* this Order, is available in the office of the Commissioner, Latur Municipal Corporation, Dist. Latur during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts/Rules).

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

(Prasad R. Shinde)
**Under Secretary to Government**

---

# संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

३

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, लातूर यांजकडून**

**(उपचिटणीस शाखा)**

**संदर्भ १.** पोलीस अधिक्षक, लातूर यांचे पत्र जा. क्रमांक जिविशा/कावसु/अधिसुचना/९१७/२०२६ दि. ०३/०३/२०२६

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३)

**अधिसुचना**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) प्रमाणे,**

जा.क्र.२६२८/२०२६/एमएजी/कक्ष-१/कावि- ३१९ दिनांक : ०४/०३/२०२६

**आदेश**

ज्याअर्थी, पोलीस अधिक्षक, लातूर यांनी संदर्भ क्रं.१ चे पत्रान्वये कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सार्वजनिक सुरक्षितता राखणेसाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) ची तरतूद लागू करणेची मागणी केली आहे. व सदर तरतुद लागू करणेसाठी माझे समाधान झाले असल्याने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था टिकुन रहावी या दृष्टीकोनातुन प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, **केशव नेटके, अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर** खालील गोष्टीस मनाई करण्यात येते.

(अ) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या किंवा लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे.

(ब) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(क) दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

(ड) व्यक्तीचे अथवा प्रेते, किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहिरपणे घोषणा करणे, गाणे म्हणने वाद्य वाजविणे.

(इ) अशा प्राधिकांऱ्याच्या तो ज्यामुळे सभ्यता अगर नीतिमत्ता यास धोका पोहचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे अगर सोंग आणणे आणि चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे किंवा जनतेत प्रसार करणे.

**हा आदेश संपुर्ण लातूर जिल्हयाचे हद्दीत दिनांक ०६/०३/२०२६ रोजीचे ००.०१ ते दिनांक २०/०३/२०२६ रोजी २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहिल.**

२. आणि ज्याअर्थी, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्याकरीता खालील आदेश काढणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन कलम ३७ (३) चे अधिन राहून मी, **केशव नेटके, अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर** या द्वारे संपुर्ण लातूर जिल्हयाचे हद्दीत कोणत्याही सडकेवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करीत आहे. आणखी असे की, हा आदेश कामावरील कोणत्याही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय कर्मचारी, आणि विवाह, अंत्ययात्रा यांना लागु राहणार नाही. सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे अधिकार, पोलीस अधिक्षक, पोलीस उपअधिक्षक संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरिक्षक जिल्हा लातूर यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापुर्वी संबंधित उपविभागीय दंडाधिकारी किंवा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करुन दयावी. पोलीस खात्याचे परवानगी दिल्याची लेखी माहिती त्वरीत संबधित उपविभागीय दंडाधिकारी किंवा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांना कळवावे.

हा आदेश संपुर्ण जिल्हयाचे हद्दीत **दिनांक ०६/०३/२०२६ रोजीचे ००.०१ ते दिनांक २०/०३/२०२६ रोजी २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहतील.**

वरील आदेश आज दिनांक - ०४/०३/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात आले.

**मा.जिल्हादंडाधिकारी यांचे मान्यतेने /-**

**स्वाक्षरीत/-**
**(केशव नेटके)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर.**

---

४

**अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड यांजकडून**

**वाचा:-** १. मा. पोलिस अधिक्षक, बीड यांचे पत्र जा. क्र. जिविशा/प्रतिबंधक मनाई आदेश/२०२५-४७९२ बीड दि. २४/०७/२०२५

२. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३)

**-: महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश लागू करणे बाबत :-**

**आदेश**

**क्र.२०२५- ३३०९/गृह विभाग/प्र. कार्यवाही/१/१/म.पो.अ. कलम १९५१**
ज्याअर्थी, मा. पोलीस अधिक्षक, बीड यांनी बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत दिनांक २८/०७/२०२५ पासून श्रावण मास प्रारंभ होत आहे. दि. २९/०७/२०२५ रोजी नागपंचमी व दिनांक ०१/०८/२०२५ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती संपन्न होणार आहे. तसेच काही संघटनाकडून चक्काजाम आंदोलन करण्याचे आव्हान करण्यात आले आहे. तसेच काही राजकीय पक्ष, संघटनेच्या वतीने त्यांचे न्याय, मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामुळे अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण

होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसले बाबत नमूद केले आहे. तसेच जिल्हयात शांतता व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता म.पो.अधि.- १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश लागू करणे अत्यंत आवश्यक असून दि. २५/०७/२०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ०८/०८/२०२५ चे २४.०० वाजेपर्यंत चे काळात बीड जिल्हयात म. पो.अधि. चे कलम ३७ (१) (३) लागू करणेस विनंती केली आहे.

आणि ज्या अर्थी, सदर कालावधीकरीता महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे या सारखे आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही" या निर्बंधाचा समावेश करणे बाबत विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. पोलीस अधीक्षक, बीड यांचे अहवालावरुन जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३१ (१) (३) प्रमाणे जिल्हयात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी शिवकुमार स्वामी, अपर जिल्हादंडाधिकारी, बीड या आदेशाद्वारे असे निर्देश देत आहे की, शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास खालील गोष्टी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

१. शस्त्र, सोटे, काठी, तलवार, बंदूक जवळ बाळगणार नाहीत.

२. लाठया, काठया, शारिरीक इजा होण्यास कारणीभूत ठरतील, सहज हाताळता येतील, अशा वस्तू, साहित्य बाळगणार नाहीत.

३. कोणतेही दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणार नाहीत.

४. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा फोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे गोळा करुन ठेवणार नाहीत, बाळगणार नाहीत किंवा तयार करणार नाहीत.

५. प्रक्षोभक भाषणे, अंगविक्षेपण, विडंबनात्मक नकला करणार नाही. सभ्यता, नीतिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी घोषणा फलक किंवा इतर कोणत्याही वस्तू, साहित्य जवळ बाळगणार नाहीत.

६. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जी देशाच्या संविधनातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचविणारी असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचविणारी असेल अशी कृती करणार नाहीत. तसेच जाहिरपणे प्रक्षोभक भाषण व असभ्य वर्तन करणार नाहीत.

७. व्यक्ती, शव, प्रेत, आकृती किंवा त्याच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणार नाहीत.

८. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही किंवा मिरवणुक, मोर्चा काढता येणार नाही.

सदर आदेश बीड जिल्हयाच्या हद्दीत दिनांक **२५/०७/२०२५** रोजीचे **००.०१** वाजेपासून ते दि. **०८/०८/२०२५** चे **२४.००** वाजेपर्यंत लागू राहतील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागू राहणार नाहीत. अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरी शिवाय १५ दिवसांपेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकाऱ्याची पूर्वमान्यता घेणे आवश्यक असेल.

**सदर आदेश माझ्या सही शिक्यानिशी दिला**.

**स्वाक्षरीत/-**
**अपर जिल्हादंडाधिकारी, बीड**

---

**५**

**अपर निबंधक (त.व.नि)**

**सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांजकडून**

**अधिसूचना**

**वाचावे :-**

१. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. पतसंस्था/सआ-५/खर्च/वसुलीआदेश/२०१८ दि. ०६/०४/२०१८

२. या कार्यालयाचे परिपत्रक जा. क्र. पतसंस्था /सआ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१८, दि. ३१/१०/२०१८

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, दि. वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि. बीड यांचा प्रस्ताव दिनांक १९/०३/२०२५.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये आदेश.**

**जा.क्र. ना.बँका/१-सआ/वैद्यनाथ बँक/का.क १५६/२०२५/८४० दिनांक ०१/०४/२०२५ :-** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, मिलिंद आकरे, अपर निबंधक (तपासणी व निवडणूक), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये **वैद्यनाथ अर्बन को-आप बँक लि. बीड** या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम ९८ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेली वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतूदीनुसार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दि. ३१/०३/२०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

| अ.क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नांव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बी. सी. जाधव | उपसरव्यवस्थापक | वसुली अधिकारी | महाराष्ट्र राज्य |
| २ | श्री. एस. ए. कापसे | व्यवस्थापक | वसुली अधिकारी | महाराष्ट्र राज्य |
| ३ | श्री. आर. पी. फड | सहा. व्यवस्थापक | वसुली अधिकारी | महाराष्ट्र राज्य |
| ४ | श्री. पी. बी. भन्साळी | सहा. व्यवस्थापक | वसुली अधिकारी | महाराष्ट्र राज्य |
| ५ | श्री. टी. डी. मुंडे | सहा. व्यवस्थापक | वसुली अधिकारी | बीड जिल्हा |
| ६ | श्री. व्ही. डी. आघाव | सहा. व्यवस्थापक | वसुली अधिकारी | बीड जिल्हा |
| ७ | श्री. एस. एल. साबळे | सहा. व्यवस्थापक | वसुली अधिकारी | लातूर जिल्हा |
| ८ | श्री. व्ही. डी. भोकरे | सहा. व्यवस्थापक | वसुली अधिकारी | अहमदनगर जिल्हा |

**अटी :-**

१. वसूली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १९६१ चा नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसूलीची कार्यवाही करावी. कर्ज वसूली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सुचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करुन आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम ९८ व १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसूली अधिकारी यांनी या कार्यालयाचे दिनांक ३१/१०/२०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमहा विहीत नमुन्यात कर्ज वसूलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांना सादर करावी.

४. वसूली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसूली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसूलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५०४/ प्र. क्र. २३१/१५- स, दिनांक २३/११/२००६ अन्वये वसूली अधिकांऱ्याना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ६/६/२०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहरेचा वापर करण्यात यावा.

७. **वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट" किंवा "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्या ऐवजी "वसूली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

८. वसूली अधिकाऱ्यास वसूलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर **"वसुली अधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि. बीड"** असा फलक लावता येईल.

९. वसूली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/ जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँकाकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देवून परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसूली अधिकाऱ्यास, थकबाकीदारांकडून वसूली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दि. ०६/०४/२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

११. या कार्यालयाचे दिनांक ३१/१०/२०१८ रोजीच्या परिपत्रकीय सुचनांचे वसूली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसूली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारानिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाच मध्ये नमुद केल्याप्रमाणे घ्यावा.

१२. वसूली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस, आदेश/ घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसूली अधिकारी यांनी नोटीस बजावताना नोटीसमध्ये त्यांचे नाव पदनाम व भ्रमणदुरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

१३. वसूली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीनी किमान तीन वर्षातून एकदा मान्यताप्राप्त संस्थेकडून तीन दिवसाचे वसूलीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

**(मिलिंद आकरे)**
**अपर निबंधक, (त.व.नि.),**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

६

**जिल्हा उपनिबंधक**

**सहकारी संस्था,लातूर यांजकडून**

**आदेश**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन वटहुकूम नं १४ दि. १३/१०/१९८१.

२. महाराष्ट्र शासन कृषी सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई अधिसुचना क्र सहिससी/१०८१/३३३२/२२०/१५सी दि. २०/१०/१९८१.

३. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्रण्डीएम/१८४/१५६(२) लातूर दिनांक १९/०३/१९६८.

४. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील पत्र दि. २४/०६/२०१६.

५. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक ०१/०१/२०१७

६. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक ०६/०४/२०१८

७. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक ३१/१०/२०१८

८. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक ०६/०६/२०१९

९. व्यवस्थापक, महात्मा गांधी अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि., उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर यांचा प्रस्ताव दि.१९/०७/२०२५ रोजीचा व या कार्यालयास प्राप्त दि. २३/०७/२०२५

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) व नियम १०७ मधील तरतुदीनुसार**

**आदेश**

**जा.क्र./३६५४/वि-१/म.गां.अ.को-ऑ.क्रे.सो.लि.उदगीर/१५६(१) व १०७/२०२५ दि.:- १४/११/२०२५** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, एस. व्ही. बदनाळे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर या अधिसुचनेद्वारे महात्मा गांधी अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि., उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर या संस्थेच्या खालीलप्रमाणे नमुद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व (२) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे २ (एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील पोटनियम ३,५,६,७,९,१०,११ (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतूद वगळून) १२,१३,१४,१५,१७,१८ व २० (अ) नुसार वरील कायद्याचे कलम १०१ अनुसार दिलेल्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्यासाठी या आदेशाच्या दिनांकापासून दि. ३१ मार्च २०२६ या कालावधीकरीता अधिकार प्रदान करीत आहे.

| अ.क्र. | वसुली अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा. | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. उकंडे सचिन रामराव | वसुली अधिकारी | विशेष वसुली व विक्री अधिकारी विशेष वसुली व विक्री अधिकारी | संस्थेच्या कार्यक्षेत्रापुरते |

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्जवसुलीची कार्यवाही करावी.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये कर्ज वसुलीचे अधिकार केवळ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्रांचे अंमलबजावणीकरिता असतील.

३. प्रस्तुत व्यक्तीची बदली, सेवा निवृत्ती, मृत्यू झाल्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

४. या कार्यालयास उपरोक्त अधिकार मागे घेण्यास हक्क राहील.

५. विशेष वसुली अधिकारी यांनी नमुद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास तसेच प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास काढून घेतले जातील व कायदेशीर कारवाई करण्यात येतील.

६. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि. बेसिन कॅथॉलीक को ऑपरेटीव्ह बँक विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ०५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नांवापुढे कोठेही महाराष्ट्र शासन नियुक्त आणि सिव्हील कोर्ट किंवा एक्झीक्युटीव्ह कोर्ट या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकांऱ्यानी त्यांच्या नावापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

८. नियमाप्रमाणे अधिकार (सरचार्ज) वसूल करुन संस्था स्तरावर त्यांची स्वतंत्र नोंदवही ठेवून जमा झालेल्या सरचार्ज ज्या त्या वेळी शासकीय कोषागारात भरणा करुन केलेल्या चलनाच्या प्रतीसह अहवाल दरमहा या कार्यालयास सादर करावा.

९. शासन निर्णय क्र संकिर्ण - १५०४/प्र.क्र. २३१/१५ - स दिनांक २३/११/२००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांना सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करणेस मनाई आहे.

१०. संस्थेची मागणी व थकबाकी वसुली अभावी संस्थेस येणारी अडचण याबाबी लक्षात घेवून थकबाकी वसुली होण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेने प्रस्तावातील केलेल्या मागणीस अनुसरुन सदरचे अधिकार प्रदान करणेत येत असून होणारा सरचार्ज चलनाचा भरणा संस्थेचे मुख्यालय ज्या ठिकाणी असेल तेथील संबंधित निबंधक कार्यालयामार्फत तपासणी करुन शासकीय कोषागारात जमा करण्यात यावा.

११. विशेष वसुली अधिकारी यांनी थकबाकीदारांकडून प्रमाणपत्रानुसार होणारी रक्कम व अधिभार याशिवाय इतर कोणताही खर्च वसूल करण्यात येवू नये.

१२. जप्त केलेल्या मालमत्तेचा ताबा विक्री प्रमाणपत्र दिल्यानंतरच लिलाव खरेदीदारास देण्यात येईल. तोपर्यंत मालमत्ता केवळ जप्त करण्यात येईल व ही जप्ती जारी ठेवतांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. या काळात कर्जदारांस अशा मालमत्तेच्या ताब्यापासून वंचित ठेवता येणार नाही.

तसेच मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश दिनांक ०६/०४/२०१८ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व त्याखालील नियम १०७ अन्वये वसुली अधिकांऱ्यानी वसूल करावयाच्या हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशीकेचा खर्च (cost of process) खालीलप्रमाणे निश्चित केलेला आहे.

| अ.क्र. | वसुलीचे टप्पे | आदेशीकेचा खर्च |
|---|---|---|
| ०१ | वसुली दाखला/दाखला/हुकुमनामा प्राप्त झाल्यानंतर आणि मागणी नोटीस दिल्यानंतर जप्ती नोटीस देण्यापुर्वी | एकूण वसुलपात्र रक्कमेच्या ०.५०% |
| ०२ | जप्ती नोटीस दिल्यानंतर व जप्ती केल्यानंतर | एकूण वसुलपात्र रक्कमेच्या ०.७५% |
| ०३ | लिलाव जाहीर करुन जंगम/स्थावर मालमत्तेच्या लिलावास मान्यता मिळाल्यानंतर | एकूण वसुलपात्र रक्कमेच्या १.५०% |

**अटी व शर्ती :-**

१. वसुली अधिकारी यांना हुकुमनामा/वसुली दाखला यामधील वसुलपात्र रक्कम व उपरोक्त नमुद हुकुमनाम्याच्या वसुली दाखल्याच्या आदेशीकेचा खर्च (cost of process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही.

२. लिलावाद्वारे मालमत्ता विक्री केल्यानंतर कमाल १.५०% दरानेच आदेशीकेचा खर्च वसूल करता येईल अन्यथा उपरोक्त नमूद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पुर्ण वसूल होईल त्या टप्पे निहाय दरानेच असा खर्च वसूल करावा.

३. उपरोक्त नमूद आदेशाप्रमाणेच खर्चाचे दराची आकारणी व वसूली संस्थेस एका कर्जदारांकडून जास्तीत जास्त रक्कम रु. १.५० लाख मर्यादेतच आदेशीकेचा खर्च म्हणून रक्कम वसूल करता येईल.

४. उपरोक्त अट क्र. १ व ३ मध्ये नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त वसुली अधिकारी यांनी जादा रक्कम वसुल केल्यास ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

५. प्रस्तुत खर्चाचा वापर वसुली अधिकारी/संस्था यांनी वसुली दाखल्याची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी जाहीरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.

६. संस्थने याप्रमाणे वसुल केलेल्या खर्चाबाबत व त्यांच्या विनियोगाबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकाने लेखापरिक्षण करताना खर्चाची आकारणी व त्यांचा विनियोग योग्य पध्दतीने केला आहे किंवा नाही या बाबत तपासणी करुन त्याबाबतचे निष्कर्ष लेखापरिक्षण अहवालामध्ये करणे बंधनकारक राहील. लेखापरिक्षण अहवालामध्ये याबाबत गंभीर दोष निदर्शनास आल्यास संबंधीत संस्थेच्या आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे.

(एस.व्ही.बदनाळे)
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था,लातूर.**

---

**७**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांजकडून**

**अधिसुचना**

**जा.क्र.वि-१/रघुकुल अर्बन को-ऑप क्रेसो लि,लातूर/अधिसुचना/२०२५/३०३३.- दिनांक - ०४/०९/२०२५ :-** मी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर याद्वारे अधिसुचित करीत आहे की, **रघुकुल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि, लातूर ता. जि. लातूर** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असुन तिचा **नोंदणी क्रमांकः- एलटीआर/आरएसआर (सीआर)/१५८४/२०२५ दिनांक ०४/०९/२०२५** असा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १२ (१) व महाराष्ट्र संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) अन्वये संस्थचे वर्गीकरण **" साधन संपत्ती संस्था"** व उपवर्गीकरण **" कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था"** असे करण्यात आलेले आहे.

**(एस.व्ही.बदनाळे)**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,लातूर**

---

८

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांजकडून**

**अधिसूचना**

**जा. क्र. वि-१/पद्मनाभ अर्बन को-ऑप क्रेसो लि, लातूर/ अधिसूचना/ ४१६१/२०२५ दिनांक :- २९/१२/२०२५** मी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर याद्वारे अधिसूचित करीत आहे कि, **/पद्मनाभ अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि, लातूर ता.जि.लातूर ही** संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून तिचा **नोंदणी क्रमांक :- एलटीआर/आरएसआर (सीआर)/१५८७/२०२५ दिनांक. २९/१२/२०२५** असा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १२ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण **" साधन संपत्ती संस्था"** व उपवर्गीकरण **" कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था"** असे करण्यात आलेले आहे.

**(व्ही. एल. पोतंगले)**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,लातूर.**

---

९

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांजकडून**

**अधिसुचना**

**जा.क्र.वि-३/लातूर जिल्हा पत्रकार गृहनिर्माण सह, संस्थाम, बाभळगाव/ अधिसुचना/७८६/२०२५ दिनांक - ०४/०४/२०२५** मी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. लातूर याद्वारे अधिसुचित करीत आहेत की, **लातूर जिल्हा पत्रकार गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या, नविन रिंग रोड, सारोळा-बाभळगांव रोड, बाभळगांव ता. जि. लातूर** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असुन तिचा **नोंदणी क्रमांक:- एलटीआर/एलटीआर/एचएसजी (टीओ)/१४७६ सन २०२५ दिनांक :- ०४/०४/२०२५ असा आहे.**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १२ (१) व महाराष्ट्र संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) अन्वये संस्थचे वर्गीकरण **" गृहनिर्माण संस्था"** उपवर्गीकरण **" भाडेकरु मालकी हक्क गृहनिर्माण संस्था" (भूखंडधारक/प्लॉटधारक)** असे करण्यात आलेले आहे.

**बाभळगांव रोड**

**(बी. डी. दुधाटे)**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था,लातूर.**

---

१०

**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांजकडून**

**अधिसूचना**

**वाचा. :-**१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र/ आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१ दि.१८/०८/१९९४

२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक /दि. २२/०२/२०१९

३. मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म. राज्य) पुणे यांचे कडील अधिसूचना क्र./गावठाण/अधिसूचना/स.व्ही.सी.आर.४३२४/ स-४/९४ पुणे दिनांक २३/०९/१९९४.

४. मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य) पुणे यांचे परिपत्रक क्र./गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र. ३९/२०२१ दिनांक २५/०१/२०२१

५. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदपूर यांचे कडील पत्र क्र.न.भू./परिरक्षण/ दिनांक २१/०२/२०२५ रोजीचे अहवाल.

**अधिसूचना**

**क्रमांक.न.भू (गा)/अधिसूचना/कावि ८३/अहमदपूर/१५४९/२०२५/ दिनांक :- ०७/०३/२०२५.** :- महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय क्र/ आस्थापना -१०९३/प्र.क्र.१९/ल-१ दिनांक १८/०८/१९९४ चे शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरांवर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कडील अधिसूचना क्र / गावठाण/ अधिसूचना/ एस.व्ही.सी.आर.४३२४/स-४/९४ पुणे दिनांक २३/०९/१९९४ अन्वये पूर्ण विभागाकडील सज्जांची पुनर्रचना करणेत आली असून सज्जांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक/दि.२२/०९/२०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे. उप अधीक्षक भूमि अभिलेख अहमदपूर यांनी त्यांचे कडील प्रस्तावा मध्ये त्यांचे अधिनिस्त गावामध्ये एकूण १ गाव नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | गावाचे नाव | सज्जा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | उप अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदपूर | थोडगा | किनगाव | |

उक्त वाचा क्र.३ अन्वये दिलेल्या शक्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद केले मौजे थोडगा ता. अहमदपूर हे गाव उप अधीक्षक अभिलेख अहमदपूर यांचे अधिनिस्त नव्याने समाविष्ट करुन त्याचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजूरी देणेत येत आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ०७/०३/२०२५ पासून होणेची आहे.

**(एन.एन.पटेल)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर**

---

११

**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांजकडून**

**अधिसूचना**

**वाचा. :**-१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र/ आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१ दि.१८/०८/१९९४

२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक /दि. २२/०२/२०१९

३. मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म. राज्य) पुणे यांचे कडील अधिसूचना/ क्र./गावठाण/अधिसूचना/स.व्ही.सी.आर.४३२४/ स-४/९४ पुणे दिनांक २३/०९/१९९४.

४. मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य) पुणे यांचे परिपत्रक क्र./गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र. ३९/२०२१ दिनांक २५/०१/२०२१

५. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदपूर यांचे कडील पत्र क्र.न.भू./ परिरक्षण/वायगाव/२०२५ दिनांक ०३/०४/२०२५ रोजीचे अहवाल.

**अधिसूचना**

**क्रमांक.न.भू (गा)/अधिसूचना/कावि१०८/अहमदपूर/२२०९/२०२५/ दिनांक :- ०८/०४/२०२५. :-** महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय क्र/ आस्थापना -१०९३/प्र.क्र.१९/ल-१ दिनांक १८/०८/१९९४ चे शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरांवर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कडील अधिसूचना क्र./ गावठाण/ अधिसुचना/ एस.व्ही.सी.आर. ४३२४/ स-४/९४ पुणे दिनांक २३/०९/१९९४ अन्वये पूर्ण विभागाकडील सज्जांची पुनर्रचना करणेत आली असून सज्जांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक/दि.२२/०९/२०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे. उप अधीक्षक भूमि अभिलेख अहमदपूर यांनी त्यांचे कडील प्रस्तावा मध्ये त्यांचे अधिनिस्त गावामध्ये एकूण १ गाव नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | गावाचे नाव | सज्जा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | उप अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदपूर | वायगाव | किनगाव | |

उक्त वाचा क्र.३ अन्वये दिलेल्या शक्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद केले मौजे वायगाव ता. अहमदपूर हे गाव उप अधीक्षक अभिलेख अहमदपूर यांचे अधिनिस्त नव्याने समाविष्ट करुन त्याचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजूरी देणेत येत आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ०९/०४/२०२५ पासून होणेची आहे.

**(एन.एन.पटेल)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर**

---

१२

**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांजकडून**

**अधिसूचना**

**वाचा. :**-१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र/ आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१ दि.१८/०८/१९९४

२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक /दि. २२/०२/२०१९

३. मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म. राज्य) पुणे यांचे कडील अधिसूचना क्र./गावठाण/अधिसूचना/स.व्ही.सी.आर.४३२४/ स-४/९४ पुणे दिनांक २३/०९/१९९४.

४. मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य) पुणे यांचे परिपत्रक क्र./गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र. ३९/२०२१ दिनांक २५/०१/२०२१

५. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदपूर यांचे कडील पत्र क्र.न.भू./ परिरक्षण/सताला/२०२५ दिनांक ०३/०९/२०२५ रोजीचे अहवाल.

**अधिसूचना**

**क्रमांक.न.भू (गा)/अधिसूचना/मौ. सताला/५७१६/२०२५/ दिनांक :- ०३/०९/२०२५. :-** महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय क्र/ आस्थापना -१०९३/प्र.क्र.१९/ल-१ दिनांक १८/०८/१९९४ चे शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरांवर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कडील अधिसूचना क्र./ गावठाण/ अधिसूचना/ एस.व्ही.सी.आर. ४३२४/ स-४/९४ पुणे दिनांक २३/०९/१९९४ अन्वये पूर्ण विभागाकडील सज्जांची पुनर्रचना करणेत आली असून सज्जांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक/दि.२२/०९/२०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे. उप अधीक्षक भूमि अभिलेख अहमदपूर यांनी त्यांचे कडील प्रस्तावा मध्ये त्यांचे अधिनिस्त गावामध्ये एकूण १ गाव नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | गावाचे नाव | सज्जा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | उप अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदपूर | सताला | किनगाव | |

उक्त वाचा क्र.३ अन्वये दिलेल्या शक्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद केले मौजे सताला ता. अहमदपूर हे गाव उप अधीक्षक अभिलेख अहमदपूर यांचे अधिनिस्त नव्याने समाविष्ट करुन त्याचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजूरी देणेत येत आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ०४/०९/२०२५ पासून होणेची आहे.

**(एन.एन.पटेल)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर**

**१३**

**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांजकडून**

**महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम, १९८७ मधील नियम ५ (१) अन्वये**

**नमुना-चार**

**क्रमांक न.पा.प्र./निवडणूक/कावि-११५/२०२६,—** ज्याअर्थी, छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड-वाघाळा, लातूर महानगरपालिकांतील नवनिर्वाचित सदस्यांची महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम, १९८७ चे नियम ५ (१) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे नियम ३ व ४ नुसार सादर केलेल्या माहितीच्या आधारे नमुना-चार मध्ये गटांची नोंद घेण्यात आलेली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड-वाघाळा, लातूर महानगरपालिकांतील नवनिर्वाचित सदस्यांचा महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम, १९८७ चे नियम ५ (१) नुसार नमुना चार मधील नोंदवहीचा गोषवारा खालील प्रमाणे असुन सदर गोषवारा साधारण राजपत्रात प्रसिध्द करणे कामी मान्यतेस्तव सादर.

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

**महाराष्ट्र स्थानिक सदस्य अनर्हता नियम, १९८७ चे नियम ५ (१) अन्वये गट नोंदणीचा गोषवारा**

| अ.क्र. | पक्षाचे नाव | निवडून आलेले सदस्य | गटाचे नोंदणी दिनांक | गटातील सदस्य संख्या | गट नेता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | भारतीय जनता पार्टी | ५७ | ०६.०२.२०२६ | ५७ | श्री. गोविंद परशुराम केंद्रे |
| २ | शिवसेना | १३ | १७.०२.२०२६ | १३ | श्री. किशोर बाबुराव नागरे |
| ३ | शिवसेना-उध्दव बाळासाहेब ठाकरे | ०६ | ०६.०२.२०२६ | ०६ | श्री. गणेश कौतिकराव लोखंडे |
| ४ | ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन | ३३ | ०९.०२.२०२६ | ३३ | श्री. शेर खान अब्दुल रहेमान |
| ५ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्ष | ०१ | १३.०२.२०२६ | ०१ | श्री. सतिंदरसिंग (नवीन) मनमोहनसिंग ओबेरॉय |
| ६ | लोकसेवा विकास आघाडी- (वंचित बहुजन आघाडी व कॉंग्रेस) | ०४+०१ | १३.०२.२०२६ | ०५ | श्री. अफसर खान यासीन खान |

ठिकाणः- छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०६.०५.२०२६

**(जी. श्रीकांत, भा.प्र.से.)**
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

**जालना महानगरपालिका**

**महाराष्ट्र स्थानिक सदस्य अनर्हता नियम, १९८७ चे नियम ५ (१) अन्वये गट नोंदणीचा गोषवारा**

| अ.क्र. | पक्षाचे नाव | निवडून आलेले सदस्य | गटाचे नोंदणी दिनांक | गटातील सदस्य संख्या | गट नेता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | भारतीय जनता पार्टी | ४१ | ०६.०२.२०२६ | ४१ | श्री. महेश विष्णू निकम |
| २ | शिवसेना | १२ | ०६.०२.२०२६ | १२ | श्री. दिपक रविशंकर राठोड |
| ३ | ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन | ०२ | ०६.०२.२०२६ | ०२ | श्रीमती. सायरा फखरुल्ला खान |
| ४ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | ०९ | ०६.०२.२०२६ | ०९ | श्री. फारुक सादिक तुंडीवाले |

**(जी. श्रीकांत, भा.प्र.से.)**
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

ठिकाणः- छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०६.०५.२०२६

---

**परभणी महानगरपालिका**

**महाराष्ट्र स्थानिक सदस्य अनर्हता नियम, १९८७ चे नियम ५ (१) अन्वये गट नोंदणीचा गोषवारा**

| अ.क्र. | पक्षाचे नाव | निवडून आलेले सदस्य | गटाचे नोंदणी दिनांक | गटातील सदस्य संख्या | गट नेता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | भारतीय जनता पार्टी | १२ | ०४.०२.२०२६ | १२ | श्रीमती तिरुमला मुंकुद खिल्लारे |
| २ | शिवसेना (उध्दव बा. ठाकरे) | २५ | ०४.०२.२०२६ | २५ | श्री. दिलीपसिंग प्रतापसिंग ठाकुर |
| ३ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) | ११ | ०४.०२.२०२६ | ११ | श्री. विजय रावसाहेब जामकर |
| ४ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस (आय) परभणी | १२ | ०४.०२.२०२६ | १२ | श्री. गुलमीर खान कलंदर खान |
| ५ | शहर विकास आघाडी (जनसुराज्य पक्ष व यशवंत सेना पक्ष) | ०३+०१ | १७.०२.२०२६ | ०४ | श्री. गंगाळे सागर रणजीत |

**(जी. श्रीकांत, भा.प्र.से.)**
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

ठिकाणः- छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०६.०५.२०२६

---

**नांदेड-वाघाळा महानगरपालिका**

**महाराष्ट्र स्थानिक सदस्य अनर्हता नियम, १९८७ चे नियम ५ (१) अन्वये गट नोंदणीचा गोषवारा**

| अ.क्र. | पक्षाचे नाव | निवडून आलेले सदस्य | गटाचे नोंदणी दिनांक | गटातील सदस्य संख्या | गट नेता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | भारतीय जनता पार्टी-शिवसेना महायुती | ४५+४ | ०६.०२.२०२६ | ४९ | श्री. कनकदंडे महेश मारोतराव |
| २ | नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी नांदेड शहर | ०२ | ०६.०२.२०२६ | ०२ | मोहमद साबेर चाऊस नासेर चाउस |
| ३ | नांदेड लोकन्याय विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी) | १०+५ | ०६.०२.२०२६ | १५ | श्री. इंजि. प्रशांत विराज इंगोले |
| ४ | ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन | १४ | ०६.०२.२०२६ | १४ | श्री. सय्यद मुजीब सय्यद मुख्तार |

**(जी. श्रीकांत, भा.प्र.से.)**
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

ठिकाण:- छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०६.०५.२०२६

---

**लातूर महानगरपालिका**

**महाराष्ट्र स्थानिक सदस्य अनर्हता नियम, १९८७ चे नियम ५ (१) अन्वये गट नोंदणीचा गोषवारा**

| अ.क्र. | पक्षाचे नाव | निवडून आलेले सदस्य | गटाचे नोंदणी दिनांक | गटातील सदस्य संख्या | गट नेता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | भारतीय जनता पार्टी | २२ | ०६.०२.२०२६ | २२ | श्री. मठपती दिपक उमाकांत |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ०१ | १०.०२.२०२६ | ०१ | श्री. विक्रांत विक्रम गोजमगुंडे |
| ३ | इंडीयन नॅशनल काँग्रेस | ४३ | ०६.०२.२०२६ | ४३ | श्री. विजयकुमार हनुमंतराव साबदे |
| ४ | वंचित बहुजन आघाडी | ०४ | ०६.०२.२०२६ | ०४ | श्री. अमोल दगडू लांडगे |

ठिकाण:- छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०६.०५.२०२६

**(जी. श्रीकांत, भा.प्र.से.)**
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. ११] गुरुवार ते बुधवार, मे १४-२०, २०२६ : वैशाख २४-३०, शके १९४८ [किंमत : ०.०० रुपये

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक–अ-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले व महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)**

**टीप :–प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.**

**मुख्याधिकारी सेनगांव नगरपंचायत यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७**

**नुसार क्र. सेनप/फरेबदल-१७/आरक्षण-४/२७०**

**दिनांक २०/०३/२०२६**

**क्र./नपसे/वि.वि./२०२५-२६/२७०.–** ज्याअर्थी सेनगांव नगरपंचायत शहराची विकास योजना शासन नगर विकास विभागाच्या अधिसूचना क्र. टीपीएस-३०२३/४५७/प्र.क्र.६१/२०२३/वियो मंजुरी/(भागशः)/ नवि-३० दिनांक ०१ जुलै २०२५ अन्वये भागाशः मंजूर करण्यात आलेला असून तो दिनांक २०/१०/२०२५ पासुन अंमलात आला आहे.

आणि ज्याअर्थी मौजे सेनगांव गट नं. ०९ (भाग), १० (भाग) हा मंजूर विकास योजना आरक्षण क्र. ०४ नगर भवन वाचनालय व सांसकृतिक सभागृह क्षेत्रफळ ०.६० हे करिता दर्शविण्यात आले आहे. आवेदकाच्या दिनांक ३१.१२.२०२५ रोजीच्या अर्जानुसार सेनगांव नगरपंचायत ठराव क्र. २८३ दिनांक ३०.०१.२०२६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेत फरेबदल करण्यास आणि ज्यानुसार सर्व वैधानिक कार्यवाही प्रशासना मार्फत करणेबाबतचा ठराव मा. अध्यक्षा सेनगांव नगरपंचायत यांनी पारित केला आहे. (या पुढे ज्याचा उल्लेख प्रस्तावित फेरबदल असा करण्यात आला आहे).

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेत वापर विभागात करावयाचा फेरबदल खालील प्रमाणे दर्शविला आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव / सर्वे क्रमांक | मंजूर विकास योनेज प्रमाणे आरक्षणाचे नाव आणि क्रमांक | विचाराधीन क्षेत्र | प्रस्तावित प्रमाणे फेरबदलानंतर अनुज्ञेय होणारा जमीन वापर विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे सेनगांव गट क्र. ०९ (भाग), गट क्र. १० (भाग) | आरक्षण क्र.०४ नगर भवन वाचनालय व सांस्कृतिक सभागृह | ०.६० (हे.) | रहिवासी प्रयोजन वापर विभाग |

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेत उपरोक्त प्रमाणे "प्रस्तावित फेरबदल" करण्याच्या अनुषंगाने ही सूचना नागरीकांकडून सूचना / आक्षेप मागविण्याकरिता प्रसिध्द करण्यात येत आहे." प्रस्तावित फेरबदलाचा दर्शविणारा भाग नकाशा सेनगांव नगरपंचायत सेनगांव येथे सूचना फलकावर जनतेच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरीकांना सूचना/ आक्षेप असल्यास ही सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात आणि वर्तमान पत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासुन ३० (तीस) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात या कार्यालयास द्याव्यात नमुद कालावधीत प्राप्त होणाऱ्या सूचना / आक्षेप सेनगांव नगरपंचायत मार्फत विचारात घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी,**
सेनगांव नगरपंचायत.

**BY CHIEF OFFICER NAGARPANCHAYAT SENGAON**
**NOTICE**
**(U/s 37 of Maharashtra Regional and Town"Planning Act.1966.)**
**No. SNP TPD/modification /s37/ Sengaon res-4/270 Date-20/03/2026.**

**No.** नपसे/वि.वि./२०२५-२६/२७०.– Whereas, the Development Plan of Sengaon Nagar Panchayat has been sanctioned partly by the Govemment, *vide* Notification No. TPS-3023/457 CR-61/2023/DP Sanction (Part)/UD-30 Date 01 July 2025 Which came into force with effect from Date 20/10/2025

And whereas in the sanctioned Development plan of sengaon Gut No.09 (Part), Gut No. 10 (Part) Of Village Sengaon is proposed for Town Hall, Lib. and C.C Reservation No. 4 having area of total 0.60 Ha. Considering the letter of applicant date 31/12/2025. President, Nagarpanchayat Sengaon *vide* its Resolution No. 283 Date 30/01/2026, has accorded sanction for modification U/s 37 (1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 In the said sanctioned Development Plane (hearin after referred to as "The said Modification") and following in the said procedure of modification.

The Details Of the propose modification regarding the deletion of reservation In sanctioned development plane U/s 37 (1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 is as follows:

| Sr. No. | Name of Village / Survey No. | As per Sanctional Development plane reservation name And No | Area (Hectare) | Proposed and Use Modification |
|---|---|---|---|---|
| 1 | Village Sengaon, Gat No. 09 (Part). Gat No. 10 (Part) | Reservation No. 04 Town Hall, Lib. and C.C | 0.60Ha | Residential Use Zone |

And therefore, this notice is published for invinting suggestions/objections from the public to carryout the said modification in sanctioned Development Plan" as per the provisions U/s 37 (1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The plan, showing The said modification is displayed on notice board in the office of Sengaon Nagarpanchayat, Sengaon. Any person who wants to submit his suggestion or objection to the said modification may submite within 30 (thirty) days from the date to publication of this notice in Maharashtra Govemment Gazette and in Newspaper Suggestions/Objections received in above said period only, will be considered by Sengaon Nagarpanchayat.

**Chief Officer**
Sengaon Nagarpanchayat.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.